(वितरण आदेश क्रमांक-७)

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत प्राप्त झालेला केंद्र हिस्सा व त्याअनुषंगाने राज्य हिस्सा वितरीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रआयो- २०१७/प्र.क्र.१५५/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,मुंबई ४०० ००१.
दिनांक :- ३१ मार्च,२०१८.

वाचा:-

(१) संचालक (ग्रामीण गृहनिर्माण),ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे क्र. J-१२०२५/०१/२०१६-RH(A/C) Maharashtra, दि.२७.२.२०१८.

(२) संचालक (ग्रामीण गृहनिर्माण),ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे क्र. J-१२०२५/०१/२०१६-RH(A/C)-४ Maharashtra, दि.९.३.२०१८.

(३) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे क्र.१२४०/प्र.आ.यो./लेखा/२०१८, दि.८.३.२०१८ व क्र.१२६६/प्र.आ.यो./लेखा/२०१८, दि.१४.३.२०१८.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाने सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशान्वये रू.३००००.०० लक्ष व संदर्भाधीन क्र.२ येथील आदेशान्वये रू.४६९२७.०० लक्ष असे एकूण रू.७६९२७.०० लक्ष राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत उघडण्यात आलेल्या योजनेच्या बँक खात्यात थेट जमा केले आहेत. केंद्र शासनाने वितरीत केलेल्या आदेशामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी वितरीत केलेल्या केंद्र हिश्याचा समरूप राज्य हिस्सा रू.१३९३१.३७ लक्ष निधी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राज्य हिस्सा	
लेखाशिर्ष	वितरीत करावयाची तरतूद (रूपये लाखात)
मागणी क्र.एल-३ मुख्य लेखाशिर्ष -२५०५ ग्रामीण सेवायोजन ७०२, जवाहर समृध्दी ग्राम योजना, (०१) इंदिरा आवास योजना (०१) (०१) इंदिरा आवास योजना- सर्वसाधारण योजना (२५०५ ०५६८) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)	**१३९३१.३७**

२. सदर खर्च ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ मध्ये केलेल्या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

३. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावे. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अमंलबजावणी करणा-या अधिका-यांनी नोंद घ्यावी.

४. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत लेखाधिकारी कार्यासन क्रमांक योजना-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचे कडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक. ४) महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

५. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणाची स्थापन व त्या अनुषंगाने पदनिर्मितीची कार्यवाही होईपर्यंत, वितरीत करण्यात येणाऱ्या निधीसंबंधात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे यांनी आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रक अधिकारी म्हणून काम पहावे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०१६ व दि.१८ एप्रिल,२०१७ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ १०२/२०१८/व्यय-१५, दि.२७.३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१११४९३७३२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2018.03.31 21:48:07 +05'30'

(अनिल काळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतींसह)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे
३) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे
५) जिल्हा कोषागार अधिकारी , ठाणे,

६) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर

७) नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई-३२.

८) सामाजिक न्याय विभाग (वि.घ.योजना), मंत्रालय, मुंबई-३२.

९) वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ-१७) मंत्रालय मुंबई-३२.

१०) आदिवासी विकास विभाग (कार्या.का.६ व १७) मंत्रालय, मुंबई-३२.

११) अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मीक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

१२) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-१, योजना-२, योजना-५ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

१३) निवड नस्ती.